# यशस्वी उद्योजकः आर. एम. मोहिते

**प्रा. डॉ. मगदुम व्ही. वाय.,** श्रीमती आ. रा. पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी.

## प्रस्तावना

कोल्हापूर शहराच्या दक्षिणेला कोल्हापूर–रत्नागिरी रस्त्यावर केर्ले नावाचे खेडेगाव असून, अशा या खेडयातील श्रीयुत रामचंद्र मारूती मोहिते उर्फ आर.एम्. मोहिते हे मूळचे रहिवासी होत. गावामध्ये इयत्ता तिसरी पर्यंतची शाळा असल्यामुळे त्यांनी इयत्ता तिसरीपर्यंत शिक्षण पूर्ण करता आले. त्यामुळे पुढील शिक्षण त्यांना घेता आले नाही. परंतु फारसे शिक्षण नसताना, सत्तेचा पाठींबा नसताना त्यांनी स्वकर्तृत्वाच्या जोरावर आपल्या अंगातील सुप्त गुणांवर गरूड झेप घेऊन आपला नावलौकिक मिळवला. व एक यशस्वी उद्योजक बनले. त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत रस्तेबांधणी, दुष्काळ हटाव मोहिम, धरणे, कालवे, इरिगेशन प्रोजेक्ट, शैक्षणिक, सहकार, उद्योग, व्यापार अशा विविध क्षेत्रात आपला नावलौकिक मिळवून एक यशस्वी उद्योजक म्हणून ख्याती मिळवली. अशा या व्यक्तीच्या विविध परंतु महत्त्वपूर्ण कार्याची नोंद घेण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.

## जीवनपरिचय

श्रीयुत रामचंद्र मारूती मोहिते यांचा जन्म १६ मार्च १९३४ मध्ये कोल्हापूर जवळ असणाऱ्या केर्ले या ग्रामीण भागात झाला. त्यांचे वडील मारूती व्यंकोजी मोहिते व आई सौ. बहिणाबाई हे दोघेही जिद्दी व कष्टाळू असल्यामुळे श्री रामचंद्र यांचे बालपण सुखासमाधानात गेले. हे एकमेव अपत्य म्हणून या कुटूंबात असल्यामुळे ते सर्वांचे लाडके होते. केर्ले हे ग्रामीण भागातील एक छोटेसे खेडे असल्यामुळे येथे फक्त तिसरीपर्यंत शाळा असल्यामुळे त्यांना आपले शिक्षण फक्त तिसरीपर्यंत घेता आले. या संस्कारमय शिक्षणापेक्षा आपल्या मुलाने मल्लविद्येत प्राविण्य मिळवावे व आपले शरीर चांगले कमवावे असा वडीलांचा आग्रह होता. त्यामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये छ. शाहू राजांच्या आदर्शामुळे मल्लविद्येचे काही काळ त्यांनी धडे घेऊन शरीर कमावले.

## व्यवसायाची सुरूवात

श्री मारूती मोहिते यांचे केर्ले येथे वास्तव्य असल्यामुळे या मुळ गावी त्यांनी छोटे मोठे व्यवसाय करून त्यांच्या या कामाच्या अनुभवावर लहान मोठया कामांचे कंत्राट घेण्यास सुरूवात केली अशा कामामध्ये प्रामुख्याने त्यांनी विहीर बांधणीसाठी दगड पुरवणे, रस्ता बांधणीसाठी व तलाव, तळी इ. कामांसाठी लागणारा सर्व प्रकारचा दगड पुरवण्याचे उत्कृष्ट कार्य केले. याच कामाचा अनुभव व प्रेरणा घेऊन श्री रामचंद्र मोहिते उर्फ आर.एम्. मोहिते यांनी आपला कंत्राटी व्यवसाय सुरू केला.

## रस्ते बांधणीचे कार्य

आपल्या वडीलांच्याकडून आलेला कामाचा वारसा त्यांनी पुढे जोमाने चालवला. त्यापैकी सुरूवातीला त्यांनी सन १९६२ ते १९७६ या कालावधीमध्ये अनेक उल्लेखनीय कामे केली. त्यापैकी विशेष उल्लेखनिय कार्य म्हणजे शाहुवाडी तालुक्यामधील अगदी दुर्गम डोंगराळ भागातील निनाई परळे ते उदगिरी हा रस्ता उत्कृष्ट प्रकारे बांधण्याचे कार्य केले. तसेच कोकणामधील राजापूरजवळील पाचल ते जवळेत्तर हा सुमारे १७ कि.मी. अंतराचा उत्कृष्ट पद्धतीचा रस्ता तयार केला. या रस्तेबांधणीच्या कामाबद्धल असे म्हणता येईल की, ट्रॅक्टर, ट्रॉली, रोड रोलर, इ. अदयावत यंत्रसामुग्री वापरून त्यांनी घेतलेले काम वेळेत केले. त्यामुळे वेळेत काम करणारे, स्वच्छ काम करणारे उत्कृष्ट कंत्राटदार म्हणून त्यांचा नावलौकिक झाला.

## दुष्काळ हटावची मुहुर्तमेढ–

सन १९७७ साली बसाप्पावाडी ता. जत, जि. सांगली या ठिकाणी पाटबंधारे विभागाच्यावतीने धरण बांधण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला होता. त्यांचा कामाचा उरक व नावलौकिक यामुळे त्यांना हे काम मिळाले. हे काम मिळाल्यापासून त्यांनी अवघ्या दोन वर्षात ते उत्कृष्ट प्रकारे कार्य पार पाडते. तेव्हा दुष्काळ हटावाच्या दृष्टीने हे कार्य ऐतिहासिक स्वरूपाचे ठरले.

## धरणे, कालवे, प्रकल्प इ. क्षेत्रातील कार्य

श्री आर.एम्. मोहिते साहेबांनी रस्ताबांधणी व दुष्काळ हटाव या कामाच्या अनुभवाच्या जोरावर त्यांच्यामध्ये मोठा आत्मविश्वास निर्माण झाला. त्याच्या जोरावर आपण प्रत्येक काम सुव्यवस्थित बिनचुक व दर्जेदार करू शकतो हे जाणून घेऊन त्यांच्या पुढील वाटचालीची सुरूवात केली. त्यामध्ये प्रामुख्याने धरण, कालवा व इरिगेशनच्या कामाचा समावेश करता येईल.

## धरणाचे कार्य

सन १९८० च्या दरम्यान रायगड जिल्हा, ता. माणगांव मधील भिरा येथील मोठया धरणांचे कंत्राट मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या अनुभवाच्या जोरावर सतत ७ वर्षे अथक परिश्रम करून या कामाचा निपटारा केला. सदरचा बांधकामामध्ये १७ लक्ष घनमीटर मातीचे काम झाले. विशेष म्हणजे हा प्रकल्प हायड्रो इलेक्ट्रीक स्वरूपाचा होता. याशिवाय कोल्हापूर जिल्हयातील भुदरगड तालुक्यामध्ये पाटगांव या खेडेगावाजवळ वेदगंगा नदीवर मातीचे धरण बांधण्यात आले. यामधील बरेच कामाचे श्रेय त्यांच्याकडे जाते. यामध्ये ३ लक्ष ३० हजार घनमीटर मातीचे पूर्ण काम झाले होते. त्यांनी हे काम सन १९९७–९८ या सालामध्ये पूर्णत्वास नेले. याशिवाय सातारा जिल्हयामध्ये वाई येथे धोम–बलकवाडी हा प्रकल्प पूर्ण केला. यामध्ये मातीचे धरण, बोगदा, वेस्टवेअर आयसीपीओ यांचा समावेश होता. यामधील खोदकाम ३७६६९१ घनमीटर होते. या बोगद्याची लांबी ४५० मीटर होती. सदरच्या प्रकल्पाचा खर्च १००

कोटी रूपये झाला होता. या कामाची सुरूवात १९९९ साली होवून हे काम २००२ मध्ये पूर्ण झाले. तेव्हा एवढया मोठया कामाचा उरक पाहून त्यांचे महाराष्ट्र सरकारने विशेष कौतुक केले.

**कालव्याचे कार्य**

धरणाचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर त्यांनी सन १९८७ ते १९९० या कालावधीमध्ये सांगली जिल्हयामधील वारणा नावाच्या नदीवर २.२ किलोमीटर लांबीचा ''वारणा डावा कालवा'' योजना मुख्यत्वाने पार पाडली.

**इरिगेशन प्रोजेक्ट**

कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यामध्ये जंगमहट्टी मिडियम इरिगेशन प्रोजेक्ट हा महत्त्वाचा प्रकल्प होय. येथील धरण ३२ मीटर उंच व ११२० मीटर लांबीचे आहे. यामधील मातीचे काम ८.९६ लक्ष घनमीटर तर गवंडी काम १५००० घनमीटर आहे. अशा स्वरूपाचे काम त्यांना सन २००१ साली पूर्ण केले.

वरील कामानंतर रायगड जिल्हयातील धावरी नदीवरील मोर्ते प्रकल्प प्रथम सिडकोने हाती घेतला होता. नवी मुंबई आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट या भागामध्ये पिण्याचे पाणी पुरवणे हा या प्रकल्पाचा उद्देश होता. महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या माध्यमातून हा प्रकल्प घेण्यात आला होता. यातील मातीच्या धरणाची उंची ५३ मीटर, लांबी ३१२४ मीटर व क्षमता ७ टी.एम.सी. आहे. याशिवाय यामध्ये इंग्रजी D या आकाराच्या बोगद्याचा समावेश आहे. प्रकल्पाचा एकूण खर्च ३५० कोटी रूपये आहे. अशा या महत्त्वपूर्ण व प्रकल्पाचे पहिल्या टप्याचे काम मोहिते साहेबांनी वेळेत पूर्ण केले. त्यानंतर सदर प्रकल्प नवी मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनने घेतला आहे. याशिवाय आर.एम. मोहिते ॲण्ड कंपनीने अगदी अलीकडे आंध्रप्रदेशातील तीन प्रकल्प आंध्रप्रदेशातील मेसर्स भूरजनाम ॲण्ड कंपनी यांच्या सहकार्याने संयुक्तपणे हाती घेतले आहेत.

**शैक्षणिक कार्य**

मेहिते साहेबांच्या जन्मभूमीमध्ये श्री हनुमान हायस्कूल नावाची शाळा आहे. या शाळेची अध्यक्षपदाची जबाबदारी मोहिते साहेबांच्याकडे सन १९६७ मध्ये आली. तेव्हापासून आजतागायत अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत आहेत.

**फोर्ट इंटरनॅशनल स्कूल स्थापना**

कोल्हापूर रत्नागिरी रस्त्यावर वाघबीळ या ठिकाणी फोर्ट इंटरनॅशनल स्कूलची स्थापना केली. येथे इयत्ता ४ थी ते १२ पर्यंतचे शिक्षण दिले जाते. पन्हाळा परिसरामधील एक नावलौकिक असणारे हे शैक्षणिक संकुल आहे.

**सहकारातील कार्य**

कोल्हापूर शहरामधील शाहूपूरी रोडवर १९९६ मध्ये 'शिवनेरी नागरी सहकारी पतसंस्थेची' स्थापना केली. त्यानंतर त्या संस्थेचा विस्तार कुंभोज, रूकडी व जयसिंगपूर इत्यादी ठिकाणी झालेला असून संस्थेची सर्वांगीण विकासाची वाटचाल अगदी जोमाने सुरू आहे.

**सुतगिरण्यांची निर्मिती**

कोल्हापूर—मुंबई या हमरस्त्यावर मंगरायाचीवाडी ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे ''आर.एम्. मोहिते टेक्सटाईल्स'' या गिरणीचा प्रारंभ १९९५ साली केला. या गिरणीच्या दर्जेदार सूत उत्पादनामुळे आर.एम्. मोहिते यांचे नाव आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत झाले. याशिवाय अभिषेक कॉटन स्पिन मील लि. तामगाव या आणखीन एका सुतगिरणीची स्थापना केली. या गिरणीचे सुत उच्च दर्जाच्या सुताची निर्मिती होऊ लागली. अशा प्रकारे सुत गिरण्यांची दर्जेदार निर्मिती करून अनेक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली.

**बॅकांच्या स्थापना**

मोहिते साहेबांनी लोकांमध्ये बचतेची सवय लागावी तसेच गरजू, व्यापारी, शेतकरी व मध्यम वर्गीयांसाठी कमीत कमी व्याजदरामध्ये कर्ज पुरवठा करणेसाठी सुभद्रा बॅकेची स्थापना १९९६ साली केली. आज या बॅकेमार्फत विविध प्रकारच्या बॅकींग सेवा खातेदारांना पुरवल्या जातात. कमीत कमी वेळेमध्ये मोठा नावलौकिक मिळवणारे सुभद्रा बॅक अनेक शाखांमार्फत बॅकींग सेवा पुरवते. या बॅकेच्या शाखा, कोल्हापूरमध्ये विविध ठिकाणी असून परगावी देखील या शाखेचा विस्तार असून या सर्वांची संख्या आठ आहे. तसेच या बॅकेमार्फत विविध समाजसेवी उपक्रम राबवले जातात. यामधून,मोहीते साहेबांची समाजसेवेची तळमळ दिसून येते.

**सारांश**

ग्रामीण कुटूंबामध्ये जन्म घेतलेल्या श्री आर.एम्. मोहिते यांनी कोल्हापूर परिसरातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सहकार, सांस्कृतिक, क्रीडा, व्यापार अशा विविध घटकांमध्ये मौलीक कामगिरी दिसून येते. या सर्व क्षेत्रामध्ये उत्तमरित्या कार्य करून मोहिते साहेबांनी कोल्हापूर परिसरातच नाही तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर एक यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक मिळवला आहे. परिसराचा विकास करत असताना आधुनिक व पारंपारिक विकास कसा साधता येईल याकडे प्रामुख्याने लक्ष देण्यात आले. यामधून असे दिसते की, मोहिते साहेबांचे राहणीमान साधी असले तरी त्यांचे विचार समतोल विकास साधण्यासाठी खूप महत्त्वाचे ठरले आहेत. ग्रामीण व शहरी विकास करण्यासाठी श्री आर.एम्. मोहिते साहेब एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहेत.

**संदर्भग्रंथ सूची**

१) प्रा.एन. व्ही. शहा,(२०१२) fundamentals of entrepreneurship, centre of distance education, suk.
२) प्रा. मानकर व देशपांडे, उद्योजकतेची मुलतत्वे, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२००८).
३) www. Fortinternation.in
४) वार्षिक अहवाल, (२०१७) सुभद्रा बॅक, कोल्हापूर.
५) वार्षिक अहवाल (२०१७),R. M. Mohite Textile, Kolhapur.